नि.दि.दावा क्र.३२/२०१९
लिलाबाई –वि.– दिलीप
निशाणी क्र.१६ खाली.

**साक्षीदाराचा उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री.एस.डब्लु. ढगे वकील यांचे मार्फत शपथेवर सुरु.**

मी जो दावा दाखल केला त्याचे संपुर्ण कागदपत्र मी पाहिले आहे. हे म्हणने खरे नाही की मी वादपत्रासोबत वादनकाशा लावलेला नाही.

प्रश्न– नि.क्र.१ सोबत जोडलेला जो नकाशा आहे तो छायांकीत प्रत आहे आणी तो मोजणीबाबतचा दस्त आहे त्यावर वादनकाशा असा कुठेही उल्लेख नाही तसेच त्यावर तुमची व तुमच्या वकील साहेबांची सही नाही.

उत्तर– हे म्हणने खरे आहे.

वादीच्या वकील साहेबांनी सदर दस्त साक्षीदाराला दाखविल्यामुळे त्यास नि.क्र. देण्यास विनंती केली. प्रतिवादीच्या वकील साहेबांचा त्यास नि.क्र.देण्यास हरकत नाही. सदर दस्तास नि.क्र.४९ देण्यात येतो. गट क्र.२३६ चे मालक गोपाळ धुलधर व सुदाम धुलधर हे आहेत. माझे सासरे आज रोजी जिवंत नाही. ते कधी मयत झाले हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– दिनांक २८.१२.१९९४ तुमचे सासरे मरण पावले.

उत्तर– हे मला आठवत नाही.

प्रश्न– तुमचे सासरे व सुदामा धुरधर यांचेमध्ये झालेल्या वाटणीचा तुमच्याकडे कोणताही नकाशा नाही.

उत्तर– त्यांचे तोंडी वाटण्या झाल्या होत्या.

गट क्र.२३६ च्या पुर्वेला सुदाम धुरधर यांचे शेत आहे, पश्चीमेला सुदामा धुरधर यांचे शेत आहे, उत्तरेला सडक आहे, दक्षिणेला माझे शेत आहे. हे म्हणने खरे आहे की उत्तरेला गट क्र.१ व २ आहे. हे म्हणने खरे नाही की गट क्र.२ चे मालक विदर्भ पाटबंधारे विभाग, महामंडळ नागपुर, कार्यकारी अभियंता, जिगांव प्रकल्प शेगांव हे आहेत. हे म्हणने खरे आहे की गट क्र.१ चे मालक भिमराव देशमुख व इतर आहेत. मोजणी केली त्यावेळी गट क्र.१ व २ च्या मालकांना नोटीसेस काढल्या होत्या. हे म्हणने खरे नाही की तयांना कोणत्याही मोजणीच्या नोटीस काढण्यात आले नाही. हे म्हणने खरे आहे की गट क्र.२३६ च्या दक्षिणेला एक भोनगांव फाटा ते घोडेगांव रस्ता जातो व तो जिल्हा परीषद अंतर्गत बांधण्यात आलेला आहे. हे म्हणने खरे नाही की या मोजणीची नोटीस कार्यकारी अभियंता जि.प.यांना देण्यात आली नाही. हे म्हणने खरे आहे की सुदामा यांने गट क्र.२३६ चे ६ गुंठे जमीन गजानन नारायण कोकाटे यांना विक्री केली आहे. हे म्हणने खरे नाही की यांनादेखील या मोजणीची नोटीस पाठविण्यात आली नाही. हे म्हणने खरे आहे की मोजणीमध्ये कोकाटे यांचे ताब्यात गेलेल्या जमीनीचा उल्लेख नाही.

हे म्हणने खरे नाही की नकाशामध्ये भोनगांव फाटा ते घोडेगांव रस्त्यात किती जमीन गेली याचा उल्लेख नाही. हे म्हणने खरे नाही की दिनांक ०५.०७.१९९९ रोजी सुदामा धुरधर याने प्रतिवादी क्र.१ ला २१७८ चौ.फुट जमीन गुंठेवारी पध्दतीने विक्री करण्याचा रुपये १२,०००/– चा करारनामा केला. हे म्हणने खरे नाही की दिनांक ०५.०७.१९९९ पासुन प्रतिवादी क्र.१ चा करारनाम्यानुसार ताबा आहे व त्यांचे वापरात आहे. हे म्हणने खरे आहे की दिनांक ०५.०७.१९९९, १४.११.२००६ रोजी प्रतिवादी क्र.२ यांनी सुदामा धुरधर यांचेकडुन गुंठेवारी पध्दतीने प्रत्येकी २१७८ चौ.फुट अशी एकुण ४३५६ चौ.फुट जागा विकत घेतली व सदर जागा त्याचे ताब्यात आहे. माझे वकील साहेबांनी दिनांक ०७.०८.२०१९ रोजी प्रतिवादीला पाठवलेली नोटीस ही पाठविण्यापुर्वी मला समजावुन सांगीतली होती. हे म्हणने खरे आहे की सदर नोटीसमध्ये प्रतिवादींनी कोणत्या तारखेला अतिक्रमण केले ती तारीख नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की करारनाम्याप्रमाण दोघांच्या ताब्यात जागा असल्यामुळे मी नोटीसमध्ये तारखा लिहीलेल्या नाही. हे म्हणने खरे नाही की त्यामुळे माझ्या दाव्यात व प्रतिज्ञालेखात त्याचा उल्लेख नाही. प्रतिवादींनी दाखल केलेल्या लेखी जबाबाची माहीती मला नाही. माझ्या वकील साहेबांनी मला दाव्यामध्ये लेखी जबाब दाखल झाल्याबाबतची माहीती दिलेली आहे.

प्रश्न– अभिलेखावर लेखी जबाब दाखल केले त्यामध्ये सदर करारनाम्याबाबत उल्लेख केलेला आहे. तुम्ही या प्रकरणात सुदामाला पक्षकार म्हणुन समाविष्ट केले नाही.

उत्तर– सुदामा तीन चार वर्षापुर्वी मरण पावले.

प्रश्न– सुदामाला किती मुले मुली आहेत

उत्तर– सुदामाला राजेंद्र व विजय धुरधर असे दोन मुले व एक मुलगी मनोरमा वांदेस्कर रा.केळवद आहे.

हे म्हणने खरे आहे की त्यांना सदर प्रकरणात पक्षकार केले नाही. हे म्हणने खरे नाही की मोजणीची नोटीस प्रतिवादी क्र.२ यांना दिली नाही. हे म्हणने खरे नाही की दाव्यात नमुद केलेल्या चतु:सिमा व साक्षीत सांगीतलेल्या चतु:सिमा वेगवेगळया आहे. हे म्हणने खरे नाही की दाव्यात नमुद केलेले कारण दिनांक १४.०६.२०१९ हे खोटे आहे. हे म्हणने खरे आहे की मोजणी करण्यापुर्वी प्रतिवादींच्या ताब्यात खलवाडीची जागा होती. हे म्हणने खरे नाही की दाव्यामध्ये मोजणीची मुळ प्रत दाखल केलेली नाही. हे म्हणने खरे नाही की दाव्यामध्ये दाखल केलेली मोजणी प्रत प्रमाणीत प्रत आहे. हे म्हणने खरे नाही की मोजणीची मुळ प्रत कुठे आहे याबाबत साक्षीपुराव्यात उल्लेख नाही. हे म्हणने खरे आहे की माझे सासरे व सुदामा यांच्या गट क्र.२३६ ची वाटणी झालेली आहे. हे म्हणने खरे आहे की गट क्र.२३६ चा पुर्वेचा भाग सुदामाचे ताब्यात होता. हे म्हणने खरे

आहे की उत्तरेकडील भाग देखील सुदामाचे ताब्यात होता. हे म्हणने खरे नाही की सुदामाने कायदेशीररीत्या प्रतिवादींना करारनाम्याप्रमाणे जागा विकलेल्या आहे. हे म्हणने खरे आहे की प्रतिवादींच्या ताब्यात १९९९ व २००६ पासुन गुरेढोरे बांधण्याकरीता ताब्यात आहे. हे म्हणने खरे नाही की प्रतिवादी क्र.२ यांनी सदर जागेत विद्युत जोडणी घेतलेली आहे. हे म्हणने खरे नाही की सदर दाव्यामध्ये मुळ मोजणी नकाशा व वाद पत्र नकाशा जोडलेला नाही व प्रतिवादीविरुध्द खोटा दावा दाखल केलेला आहे. हे म्हणने खरे नाही की प्रतिवादींनी कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणने खरे नाही की खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MADHURI KEWAL GOTE
Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.08.18 14:42:12 +0530

दि.१८.०८.२०२६

(श्रीमती एम. के. गोटे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कोर्ट क्र.२ शेगांव.